| MHND060003032026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.५५/२०२६**<br>**शंकर लिंगप्पा पांचाळ व इतर वि. निरंक.** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र.१ हा पती, अर्जदार क्र.२ ही मुलगी, अर्जदार क्र.३ हा **मयत सुनिता शंकर पांचाळ** यांचा मुलगा आहे. मयत सुनिता शंकर पांचाळ यांचा **दि.१४/०९/२०२०** रोजी मृत्यु झाला आहे. मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे आई वडील हे पुर्वीच मयत झालेले आहेत.

३. मयत सुनिता शंकर पांचाळ यांच्या निधनानंतर त्यांना अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही कायदेशीर वारस नसल्याने व त्यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने त्यांनी सदरचा अर्ज मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्याकरिता केलेला आहे.

४. अर्जदार क्र. १ ते ३ हेच मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे वारस असल्याचे सिद्ध करणेकरिता त्यांनी खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला आहे.

| **अ.क्र.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्रमांक** |
|---|---|---|
| १. | मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे अर्जदार क्र.१ ते ३ हे वारस असल्याबाबत सरपंच, अर्जापुर, ता.बिलोली, जि.नांदेड यांनी दिलेले वारसा प्रमाणपत्र. | **नि.क्र.५/१** |
| २. | मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे अर्जदार क्र.१ ते ३ हे वारस असल्याबाबत पोलीस पाटील, अर्जापुर, ता.बिलोली, जि.नांदेड यांनी दिलेले वारसा प्रमाणपत्र. | **नि.क्र.५/२** |

| | | |
|---|---|---|
| ३. | डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय मेडीकल कॉलेज व श्री. गुरू गोविंद सिंघजी मेमोरियल हॉस्पीटल, नांदेड यांनी दिलेले मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे मृत्यु प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | **नि.क्र.५/३** |
| ४. | ग्राम पंचायत अर्जापुर यांनी दिलेले मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी केलेली प्रत. | **नि.क्र.५/४** |
| ५. | मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे आधार कार्डाची पडताळणी केलेली प्रत. | **नि.क्र.५/५** |
| ६. | अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधार कार्डांच्या पडताळणी केलेल्या प्रती. | **नि.क्र.५/६, ५/७ व ५/८** |
| ७. | दिनांक ११.०३.२०२६ रोजीचे दैनिक 'गोदातीर' या वृत्तपत्रातील जाहीर प्रगटन. | **नि.क्र.१० खाली** |

५. अर्जदारांतर्फे साक्षीदार शंकर लिंगप्पा पांचाळ यांचे शपथपत्र **नि.क्र.१२** व अर्जदारांतर्फे पुरावा संपल्याची पुरसिस **नि.क्र.१३** वर दाखल करण्यात आली. अर्जदाराच्या विधिज्ञांचा युक्तीवाद विस्तृतपणे ऐकण्यात आला.

६. नि.क्र.१ वरील आदेशाव्दारे सर्व सामान्यांकडुन हरकत आक्षेप नोंदविण्याकरिता जाहीर प्रगटन दैनिक 'गोदातीर' या वृत्तपत्राचे दिनांक ११.०३.२०२६ च्या आवृत्तीमध्ये प्रसिद्ध करण्यात आले. विहीत मुदतीत अर्जदारांनी दाखल केलेल्या सदरच्या अर्जास कोणीही आक्षेप नोंदविला नाही. सबब प्रस्तुत अर्ज निर्वीवादीत राहीला.

७. साक्षीदार शंकर लिंगप्पा पांचाळ यांनी त्याच्या **नि.क्र.१२** वरील साक्षीपुराव्यात अर्जातील विवाद कथनांचा हुबेहुब उहापोह केला व पुराव्यामध्ये मयताशी नाते संबंध आणि वारस असल्याचा दर्जा प्रर्कषाने उदघृत केला आहे. साक्षीदार यांच्या पुराव्यातील विधानांचे कोणत्याही प्रकारे खंडण झालेले नाही. मयत सुनिता शंकर पांचाळ

यांच्या मृत्युची सिध्दता मृत्युप्रमाणपत्रा अन्वये सिद्ध होत आहे. मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे अर्जदार क्र.१ हा पती व अर्जदार क्र.२ ही मुलगी व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे. यावरुन मयत सुनिता शंकर पांचाळ यांना अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणतेही वारस नाहीत हे स्पष्ट होत आहे. खंडणाअभावी दाखल पुराव्यावर विश्वास न ठेवण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर उपलब्ध नाही. उपरोक्त परिस्थितीनुसार व कायद्यातील तरतुदींची पाहणी करता अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत सुनिता शंकर पांचाळ यांचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरले आहेत. परिणामतः निम्नलिखित आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार क्र.१ शंकर लिंगप्पा पांचाळ, २. प्रीती संदीप पांचाळ व ३. अभिनय शंकर पांचाळ यांना **मयत सुनिता शंकर पांचाळ** यांचे वारस म्हणुन घोषित करण्यात येत आहे. |
| ३ | अर्जदार क्र.१ ते ३ यांच्याकडुन नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरुन बॉम्बे रेग्युलेशनचे पुरवणी ब मधील विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. |

DNYANESHWAR SURYAKANT NIMBALKAR

Digitally signed by DNYANESHWAR SURYAKANT NIMBALKAR
Date: 2026.07.28 16:26:52 +0530

दिनांकः २८.०७.२०२६

**(डि. एस. निंबाळकर)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word, as per the original Judgment".

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A.K. Mohammad, Grade - III |
| Name of court | : | Jt. CJJD & JMFC, Biloli. |
| Judgment dictated on | : | 28.07.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 28.07.2026 |
| Judgment uploaded on | : | 28.07.2026 |